( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६ अ करिता )

क्र.पोमसं/३/११/६/पोनि पदो (माता प्रकरण)/२३/२०१६
**राज्य पोलीस मुख्यालय, पोमसं यांचे कार्यालय.**
शहीद भगत सिंह मार्ग, कुलाबा, मुंबई-०१
दिनांकः- २४/०५/२०१६.

वाचाः- १. म.शा., गृ.वि., अर्ध शासकीय पत्र, क्र.पीएम्एन्-०१०९/ प्र.क्र.५१५ / पोल-५ ब, दिनांक ०६/०७/२००९,
२. म.शा., गृ.वि., पत्र, क्र.पीएम्एन्-०१०९/प्र.क्र.५१५/पोल-५ ब, दिनांक १०/०८/२००९, व
३. सन २०१४, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, दिनांक २५ जून २०१४ व सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, दिनांक ०६ एप्रिल, २०१५.

## आदेश

उपरोक्त संदर्भ क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न चे पोट कलम (२) व त्याखालील सुधारीत स्पष्टीकरणानुसार पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, खालील नमूद केलेल्या निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून, **"निःशस्त्र पोलीस निरीक्षक"** पदावर **तात्पुरत्या स्वरुपात** पदोन्नती देण्यात येत असून सदर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र.४ मधील घटकात करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | सहायक पोलीस निरीक्षकाचे नांव | सध्याची नेमणूक | पो.नि. पदावर तात्पुरत्या पदोन्नतीवरील नेमणूक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | नंदू बच्चूमल नारंग | पो.प्र.कें., खंडाळा | पुणे शहर |
| २. | संतोष विठ्ठलराव वैरागडे | बृहन्मुंबई | नागपूर ग्रामीण |
| ३. | दिलीप शंकर कार्ले | धुळे | नाशिक शहर |
| ४. | चंद्रकांत जनार्दन ठाकूर | पुणे शहर | गु.अ.वि. |

२. उपरोक्त सहायक पोलीस निरीक्षकांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, आणि कार्यमुक्त केल्याचा, तसेच पोलीस निरीक्षक पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक कृपया तातडीने ह्या कार्यालयास कळवावा.

३. सदर सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदावरील **तात्पुरती पदोन्नती** खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे:-

**अ)** सदर पदोन्नती प्रथम ११ महिने, किंवा शासन व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडून निवडसूचीस मान्यता मिळेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता असेल,

**आ)** सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधीत स.पो.नि. यांना नियमीत पदोन्नतीचे, म्हणजे सेवाज्येष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत.

**४. वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या सहायक पोलीस निरीक्षकांविरुद्ध आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कारवाई केली असेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास फॅक्सद्वारे तात्काळ पाठवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी.**

५. उपरोक्त आदेशांत नमूद केलेल्या ज्या सहायक पोलीस निरीक्षकांविरुद्ध विभागीय चौकशी प्रलंबित आहे, अथवा विभागीय चौकशीत निगमित केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही, अशा सहायक पोलीस निरीक्षकांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा पदोन्नतीच्या पदात भोगण्यास ते तयार असल्याची लेखी पूर्वसंमती घेवून व त्यास अधिन राहूनच पदोन्नतीवर सोडण्यात यावे, व तसा स्पष्ट उल्लेख संबंधीत सहायक पोलीस निरीक्षकांच्या पदोन्नतीसंबंधीच्या कार्यमुक्ततेच्या आदेशांमध्ये करण्यात यावा. तसे संमतीपत्र ह्या कार्यालयास दोन प्रतीत (लक्षवेध - कक्ष ३ व कक्ष ११ यांना) पाठविण्यात यावे, व त्याची प्रत संबंधीत अधिकारी ज्या घटकात तात्पुरत्या पदोन्नतीवर बदलून जात आहेत, त्या घटकाप्रमुखास देखील पाठवावी. ज्या सहायक पोलीस निरीक्षकांच्या विरुद्धच्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी सुरु झालेली आहे, अशा सहायक पोलीस निरीक्षकांना पदोन्नतीवर कार्यमुक्त न करता त्याबाबतचा सविस्तर अहवाल ह्या कार्यालयास पाठवून पुढील आदेशांची वाट पहावी.

६. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/१४-अ/६७/एमएन/१२९/२०१४, दिनांक ०१/०९/२०१४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसताना पदोन्नती देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या विशेष हक्क याचिकेतील आदेशाच्या अधिन राहून उपरोक्त आदेशांतील मागासवर्गीय सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. तरी, उपरोक्त मागासवर्गीय पोलीस अधिकाऱ्यांकडून संबंधीत घटकप्रमुखांनी जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी.

७. पदोन्नती झालेल्या सहायक पोलीस निरीक्षकांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करण्यापूर्वी ते ज्या घटकात पदोन्नतीवर जाणार आहेत, त्या घटकप्रमुखांकडे रिक्त पदांची खात्री करुनच त्यांना कार्यमुक्त करावे. रिक्त पद नसल्यास तसे ह्या कार्यालयास कळवावे.

८. मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.८४५२/२००४ मध्ये दिनांक ०९/०३/२००७ रोजी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दिनांक २८/०३/२००८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची ११ %, व विशेष मागास प्रवर्गाची २ %, अशा एकूण १३% आरक्षणाच्या पदावरील सर्व पदोन्नत्या ह्या मूळ याचिका क्र.८४५२/०४ च्या निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहेत व पदोन्नतीच्या आदेशांमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करावा, असे सामान्य प्रशासन विभागाने क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक ०१/०४/२००८ च्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत, **आणि मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपिठापुढे दाखल केलेला मूळ अर्ज क्र.११८०/२०१० मध्ये मा.न्यायालयाच्या** अंतिम निर्णयाच्या अधिनस्त राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहेत.

९. सन-२००१ च्या विभागीय अर्हता परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या अर्हताप्राप्त पोलीस हवालदार व सहायक पोलीस उपनिरीक्षकांपैकी काही उमेदवार म्हणजेच श्री.महेश आर्. फरांदे व इतर यांनी मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठापुढे दाखल केलेल्या याचिका क्र.४६५/२००९ मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सदर पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

१०. शासन पत्र, गृहविभाग, क्र.पीएम्एन्-०१०८/प्र.क्र. ८८३/ पोल ५ ब, दि.२९/७/०८ मध्ये नमूद केल्यानुसार, शासन निर्णय, गृहविभाग,क्र.पीएम्एन्-०२९७/सीआर-४७४/पोल-५ ब, दि.२६/२/०४